**रयत शिक्षण संस्थेचे,**

# श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज

## भूगोल विभाग

### अग्रणी महाविद्यालय अंतर्गत

### '१४ जानेवारी भूगोल दिन'

### अहवाल

अग्रणी महाविद्यालय अंतर्गत श्री. रावसाहेब रामाराव पाटील महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने **14 जानेवारी – भूगोल दिन** दि. १५/०१/२०२६ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भूगोल विषयाविषयी रुची निर्माण करणे, पर्यावरणीय जाणीव वाढवणे तसेच भौगोलिक ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात **कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. डी. ए. गाडे** यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या निमित्ताने भूगोल विभागाच्या वतीने पोस्टर प्रेजेंटेशन आयोजित करण्यात आले होते ज्यामध्ये २१ विद्यार्थांनी सहभाग घेतला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात भूगोल विषयाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. तसेच *"आधुनिक काळातील भूगोलाचे महत्त्व"* या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. एस.व्ही. पणदे यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन महावियालायाचे प्राचार्य, डॉ. व्ही. एस. शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

अग्रणी महाविद्यालय अंतर्गत संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले –

- पोस्टर प्रेजेंटेशन
- पर्यावरण व हवामान बदल विषयक चर्चा

या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्याचे स्वागत डॉ. एस. बी. राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ए.पी. सुतार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एस.जे. लगड यांनी केले.

**प्रमुख पाहुणे डॉ. डी.ए. गाडे यांच्या हस्ते पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन**






**प्रास्ताविक डॉ. एस.बी. राठोड**



**अध्यक्ष डॉ. एस. व्ही. पणदे**





प्रमुख, भूगोल विभाग